नि.दि.दावा क्र. १६८/२०२१

सुधाकर कुलकर्णी वि.जयंत कुलकर्णी व इतर

## निशाणी क्र.७० खालील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

०२. वादी यांचे म्हणणे असे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून पृथकपणे कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी यांचे कथन असे की, प्रतिवादी क्र.१ ते १६ यांनी दावा मिळकत १(अ) ही मिळकत दि.०९/१२/२०२१ रोजी प्रमोद दत्तात्रय चव्हाण व इतर ४ इसमांना रजिस्टर खरेदीखताने विक्री केलेली आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुत अर्जाव्दारे दाव्यातील सरनाम्यात अर्जात नमुद प्रमाणे प्रतिवादी क्र.२५ चे नंतर प्रतिवादी क्र.२६ ते २९ म्हणुन समाविष्ट करण्याची, दाव्यात दावा कलम ८ नंतर ८(अ) हा अर्जात नमुदप्रमाणे परिच्छेद समाविष्ट करण्याची व दावा कलम १० मध्ये अर्जातील परिच्छेद ५ मधील नमुद मजकुर समाविष्ट करुन दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे कथन केले आहे. सदरची दुरुस्ती मंजुर होणे न्यायाच्या दृष्टीने जरुरीचे आहे अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी क्र.१ ते १६ व प्रतिवादी क्र.२३ ते २६ यांनी वादीचे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादींनी वादीचा प्रस्तुत अर्ज चालण्याजोगे नसल्याचे सांगितले आहे. प्रतिवादींचे कथन असे की, प्रस्तुत दुरुस्तीने दाव्याचे स्वरुपात बदल होण्याची शक्यता आहे व प्रतिवादींच्या हक्कावर बाधा आणणारे आहे. त्यामुळे प्रतिवादींनी वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रतिवादी क्र.१८ व १९ व वादी यांनी वादीचे अर्जास म्हणणे दाखल केले आहे व योग्य तो न्यायाचे आदेश होण्याची विनंती केली आहे.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले.

०६. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

०७.	एकंदरीत वादीचा प्रस्तुतचा अर्ज पाहिला असता असे दिसते की, वादी हे स्थावर मिळकतीच्या अनुषंगाने दाव्यामध्ये काही मजकुर समाविष्ट करण्यासाठी परवानगी मागत आहेत. वादीच्या कथनाप्रमाणे दाव्याचे कामकाज सुरु असताना प्रततिवादी क्र.१ ते १६ यांनी दावा मिळकतीपैकी १(अ) ही मिळकत प्रतिवादी क्र.२६ ते २९ यांना विक्री केलेली आहे व त्याअनुषंगाने दाव्यात अर्जात नमुदप्रमाणेची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. या कथनापुष्टयर्थ वादी ने प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.१ ते १६ यांनी नमुद केलेले कारण म्हणजेच प्रस्तुत दुरुस्तीने दाव्याचे स्वरुपात बदल होणारे आहे. परंतु दुरुस्तीचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.१ ते १६ यांचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे दिसुन येते.

०८.	दुरुस्तीचे स्वरुप पाहता, ती जर मंजुर केली तर प्रतिवादी क्र.१ ते १६ यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दावा हा गुणवत्तेवर चालण्यास मदत होणार आहे. अशा परीस्थितीत नियोजित दुरुस्ती कोणत्याही प्रकारे त्यांचे हक्कांवर बाधा आणेल असे दिसत नाही.

०९.	सबब, एकंदरीत परीस्थितीचा विचार करता न्यायालयीन गुंतागुंतीची प्रक्रिया टाळण्यासाठी वादीला अर्जात नमुद केलेली दुरुस्ती करणेस परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने योग्य होणार आहे. सबब, नैसर्गिक न्यायतत्वाचे अवलोकन करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज नि.७० खर्चासह मंजुर करण्यात येते.

२. वादीला असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी मागणी प्रमाणेची दुरुस्ती १४ दिवसांचे आत करुन आवश्यक तेवढया दुरुस्त दाव्याच्या प्रती ताबडतोब याकामी दाखल कराव्यात.

३. प्रतिवादी क्र.२६ ते २९ यांना वादीने दुरुस्ती केल्यानंतर दाव्याचे समन्स काढण्यात यावे.

दिनांकः– ०६.१२.२०२३.

(श्रीमती पी.एस.गोवेकर)
सहदिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मोहोळ.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : A. S. Bakale |
| Court | : 2nd Jt. Civil Judge J. D. & J.M.F. C., Mohol. |
| Judgment / Order signed by the Presiding Officer on | : 06.12.2023 |
| Judgment / Order uploaded on | : 06.12.2023 |